1

321

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक २२/०३/२०२४

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.सीसीटी -३६२०/प्र.क्र.०४/E-७४८५२० भाग-२/पोल-३, दिनांक २१ मार्च, २०२४.

**विषय :-** राज्यातील पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी प्रकल्प सल्लागार म्हणून नियुक्त केलेल्या मे. पीडब्ल्युसी या कंपनीला मुदतवाढ देण्याबाबत.

******

**परिपत्रक -**

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र. सीसीटी -३६२०/ प्र.क्र.०४/ E-७४८५२०/ भाग-२ / पोल-३, दिनांक २१ मार्च, २०२४. ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४०३२११५५३४७३९२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह)
अपर पोलीस महासंचालक (नियोजन व समन्वय), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कार्यासन अधिकारी, का.क्र. १७

प्रत,

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके " वित्त व लेखा " या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

राज्यातील पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी प्रकल्प सल्लागार म्हणून नियुक्त केलेल्या मे. पीडब्ल्युसी या कंपनीला मुदतवाढ देणेबाबत....

**महाराष्ट्र शासन**

**गृह विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : सीसीटी-३६२०/प्र.क्र.०४/E-748520/भाग-२/पोल-३,**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, २ रा मजला, मुंबई- ४०० ०३२.

दिनांक :-२१ मार्च, २०२४

**वाचा:**

१. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे क्रिमीनल रिट पिटीशन क्र. २११०/२०१४ वरील दि. १३.८.२०१४, दि. २१.१०.२०१५, दि. २४.२.२०१६, दि,२१.९.२०१६, दि. ३१.११.२०१६, दि.१४.१२.२०१८, दि. ११.२.२०१९, व दि. ४.३.२०१९ रोजीचे आदेश.
२. मा. सर्वोच्च न्यायालयाचे क्रिमीनल रिट पिटीशन क्र. ५३९/१९८६ वरील दि. २४.७.२०१५ रोजीचा न्यायनिर्णय.
३. गृह विभाग शासन निर्णय क्र. सीसीटी-३६१५/प्र.क्र.१३०/पोल-३, दि.२३.११.२०१५, दि.२६.३.२०१८,दि. २०.६.२०१८, दि.११.१०.२०१८, दि.१४.११.२०१९, व दि.११.१२.२०१९.
४. गृह विभाग शासन पत्र क्र. सीसीटी-३६२०/प्र.क्र.४/भाग-१/पोल-३, दि.१.८.२०२२, दि.१२.७.२०२३
५. अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दिनांक १६.१.२०२४ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त, दि.७.२.२०२४ चे पत्र.
६. माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, शासन निर्णय क्रमांक: GAD – मातंस 080/4/2014-O/O Directorate of IT-DIT (MH), दिनांक १.७.२०१४,दिनांक ९.१०.२०१७ व दिनांक ९.५.२०१९ व परिपत्रक दि. २४.४.२०२३, व शासन निर्णय दिनांक ५.१०.२०२३.

**प्रस्तावना:**

लिओनार्ड झेविअर वल्दारीस व इतर यांनी महाराष्ट्र शासन व इतर यांचेविरुध्द मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे क्रिमीनल रिट पिटीशन क्र. २११०/२०१४ दाखल केली. मा. उच्च न्यायालयाने या यांचिकेत दि. १३.८.२०१४, दि. २४.२.२०१६, दि. ३०.११.२०१६ दि. १४.१२.२०१८, दि. ११.२.२०१९ व दि. ४.३.२०१९ रोजी आदेश पारीत केले आहेत. मा. उच्च न्यायालयाने पोलीस कोठडीतील मृत्यू रोखण्यासाठी राज्यातील प्रत्येक पोलीस ठाण्यांमधील प्रत्येक कॉरीडॉर, रुम व लॉकअप यामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत आदेशीत केले आहे. तसेच डी.के. बसू व इतर यांनी मा. सर्वोच्च न्यायालयात पश्चिम बंगाल राज्य आणि इतर यांचेविरुध्द क्रिमीनल रिट पिटीशन क्र. ५३९/१९८६ या प्रकरणी दि. २४.७.२०१५ रोजी निर्णय दिला आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने संवेदनशील पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही बसविणेबाबत निदेश दिलेले आहेत.

राज्यातील पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी “प्रकल्प सल्लागार” म्हणून “मे. पीडब्ल्युसी लि.(M/s. Pricewaterhouse coopers Ltd.)” या सल्लागार कंपनीच्या १ वरिष्ठ सल्लागारास व १ सल्लागारास दिनांक २०.१२.२०१९ रोजीच्या शासन पत्रान्वये दिनांक २०.१२.२०१९ ते १९.२.२०२० पर्यंत दरमहा प्रती व्यक्ती (Man-Month) तत्वावर नियुक्ती देण्यात आली असून सदर कंपनीस कार्यादेश देण्यात आले. तद्नंतर शासन निर्णय दि.३.२.२०२१ अन्वये पीडब्ल्युसी कंपनीच्या ६ वरिष्ठ सल्लागारांना १ Man-

Month साठी Milestone तत्वावर दिनांक १५.१०.२०२० ते प्रकल्प पूर्णपणे कार्यान्वित (Go Live) होईपर्यंत मुदतवाढ देण्यात आली. तद्नंतर दिनांक १.८.२०२२ च्या शासन पत्रान्वये एक वरिष्ठ सल्लागार व एक सल्लागार यांना (१० Man-Month basis) दि.१.८.२०२२ ते दि.३१.१२.२०२२ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आली. तद्नंतर उच्चस्तर शक्ती प्रदत्त समितीच्या दि.२०.४.२०२३ च्या बैठकीत "पीडब्ल्युसी लि.(M/s. Pricewaterhouse coopers Ltd.)" या सल्लागार कंपनीच्या १ वरिष्ठ सल्लागार व १ सल्लागार यांना दि.१.१.२०२३ ते दि.३०.६.२०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. तद्नंतर दिनांक २५.५.२०२३ च्या बैठकीत पोलीस ठाण्यामध्ये सीसीटीव्ही बसविण्यासाठी प्रकल्पाचे सल्लागार "पीडब्ल्युसी लि.(M/s. Pricewaterhouse coopers Ltd.)" या सल्लागार कंपनीच्या १ वरिष्ठ सल्लागार व १ सल्लागार यांना दि.१.७.२०२३ ते दि.१९.९.२०२३ या कालावधीसाठी माहिती तंत्रज्ञान विभागाच्या शासन परिपत्रक क्र. GAD-IT080/4/2014-O/O, Directorate of IT DIT(MH), Dt. 24.4.2023 नुसार मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला. यास अनुसरुन गृह विभागाने दि.१२.७.२०२३ रोजी तसा शासन निर्णय निर्गमित केला आहे.

अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली उच्च स्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दि.१६.१.२०२४ रोजीच्या बैठकीमध्ये The Committee approved the extension of the project management consultancy for PwC from 20th September 2023 to 31st March 2024 for the 2 resources (1 consultants and 1 Associate consultant) as per the new DIT GR "Government Resolution No: GAD-IT 080/4/2014-O/O DIRECTORATE OF IT-DIT(MH)" असा निर्णय घेण्यात आला त्यानुसार राज्यातील पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही प्रकल्पाच्या देखरेखीसाठी प्रकल्प सल्लागार म्हणून मे. प्राईस वॉटर हाऊस कुपर प्रा. लि., या कंपनीच्या एक सल्लागार व एक सहयोगी सल्लागार यास पूर्णवेळ तत्वावर दि.२०.९.२०२३ ते दि.३१.३.२०२४ पर्यंत माहिती तंत्रज्ञान विभागाच्या संदर्भ क्र.६ येथील दि.५.१०.२०२३ रोजीच्या शासन निर्णयास अनुलक्षून मुदतवाढ देण्यात आली, त्यानुसार शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**<u>शासन निर्णय</u> :**

राज्यातील पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही प्रकल्पाच्या देखरेखीसाठी प्रकल्प सल्लागार म्हणून मे. प्राईस वॉटर हाऊस कुपर प्रा. लि., या कंपनीच्या एक सल्लागार व एक सहयोगी सल्लागार यास पूर्णवेळ तत्वावर दि.२०.९.२०२३ ते दि.३१.३.२०२४ पर्यंत माहिती तंत्रज्ञान विभागाच्या दि.५.१०.२०२३ रोजीच्या शासन निर्णयास अनुलक्षून मुदतवाढ देण्यात येत आहे.

२. उपरोक्त सल्लागारांना देण्यात येणारे मानधन व इतर भत्ते माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या संदर्भ क्र.६ येथे नमूद दिनांक ९.५.२०१९ च्या शासन निर्णयातील, दि.२४.४.२०२३ च्या परिपत्रकातील व दि.५.१०.२०२३ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार देय राहील. तथापि, माहिती व तंत्रज्ञान विभागाने सल्लागारांच्या मानधनासंदर्भात भविष्यात काही सुधारणा केल्यास सदर सुधारणा उपरोक्त सल्लागारांना लागु राहतील. तसेच त्यासाठी माहिती व तंत्रज्ञान विभागाने सदर कंपनीची नेमणूक (Empanelment) करणे आवश्यक राहील.

३. यासाठी होणारा खर्च "मागणी क्रमांक बी-१, २०५५-पोलीस, (००) १०९, जिल्हा पोलीस (००) (०१) जिल्हा पोलीस बल (२०५५०१६८) (दत्तमत) (अनिवार्य), १३, कार्यालयीन खर्च" या लेखाशीर्षाखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दि.१६.१.२०२४ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

**५.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०३२११५५३४७३९२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

KAILAS ARJUN GAIKWAD

Digitally signed by KAILAS ARJUN GAIKWAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=b31abfcb1894c4c597cc944f19a89f474e7b98a708cc03eb46cd241a604d42bb, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=47D160717AE29C2D2661B5275D8B9B4CFAE93893BE65A27853145A4C04D865CD, cn=KAILAS ARJUN GAIKWAD
Date: 2024.03.21 16:05:11 +05'30'

**( कैलास गायकवाड )**
**सहसचिव , महाराष्ट्र शासन**

**प्रत:**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव, (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
१०. प्रधान महालेखाकार (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
११. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई / नागपूर.
१२. अधिदान व लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१३. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१४. मे. पीडब्ल्युसी प्रा.लि.(Pricewaterhouse Coopers Pvt. Ltd.), २५२, वीर सावरकर मार्ग, शिवाजी पार्क, दादर (पश्चिम), मुंबई-४०० ०२८.
१५. कक्ष अधिकारी (व्यय-७ / वित्तीय सुधारणा-१), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. अर्थ-१ शाखा, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
१७. निवडनस्ती / पोल- ३.